भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय आठवा



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय आठवा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय आठवा

अक्षरब्रह्मयोग

अर्जुन उवाच

मग अर्जुन भगवंतास म्हणाला । आता मी जे विचारले तुम्हाला । ते तुम्ही सांगा मजला । समजावुनी ॥१॥
सांगा काय ते ब्रह्म । कशास म्हणती कर्म । नि काय ते अध्यात्म । सांगा मजला ॥२॥
अधिभूत ते कैसे । एथ अधिदैव ते कवण असे । समजेल मला ऐसे । सांगा तुम्ही ॥३॥
अधियज्ञ तो काई । कोण रहातो या देही । हे मजसी काही । समजेच ना ॥४॥
अवधान ठेवता मनी । तू जाणला जातोस देहप्रयाणी । ते सारंगपाणी । समजाव मजला ॥५॥
जयापाशी असे चिंतामणी । जरी झोपला खिशात ठेवूनी । झोपेत बोलला जरी बरळूनी । ते होय सत्य ॥६॥
तसे अर्जुनाचे बोल ऐकून । म्हणाला तो भगवान । ऐक आता लक्ष देऊन । सांगतो तुजला ॥७॥
कामधेनुचा पाडा अर्जुन । बैसला छाया कल्पतरूची धरून । म्हणून इच्छांचं ते पूर्ण होणं । नवल नाही ॥८॥
जया कृष्णाने कोपून मारता । तो पावे ब्रह्ममयता । मग उपदेश तो करता । काय न होये ॥९॥
जो कृष्णच होतो आपण । कृष्णच होते तयांचे अंतःकरण । मग तेथे सिद्धिंचं ते असणं । आपोआप ॥१०॥
ऐसे होते निस्सीम । अर्जुनाठायी ते प्रेम । होता तो देव परम । प्रसन्न त्यासी ॥११॥
याच कारणे श्रीकृष्णानं । मनोगत त्याचं जाणून । केलं त्याचं समाधान । आता येथे ॥१२॥
बाळ जे स्तनापासून दूर जाते । तयाची भूक मातेस लागते । ते कधी का म्हणते । पाज दूध म्हणूनी ॥१३॥
ऐसा तो कृपाळू भगवान । होऊन पहा दयावान । करी अर्जुनासी मार्गदर्शन । प्रेमापायी ॥१४॥
मग म्हणीतले सर्वेश्वरे । जे भरले या शरीरे । तो कोण्याही प्रकारे । न होई नष्ट ॥१५॥
ऐसे जे साक्षीपण । जे शून्य नव्हे स्वभावानं । परी ते गगनाहून । सूक्ष्म असे ॥१६॥
जे अनंत आकाररहित । मन इंद्रिया नाही सापडत । ब्रह्म तया म्हणतात । बा अर्जुना ॥१७॥
जे असे निराकारपणे । न तेथे जन्माचे भासणे । वा मृत्यूच्या त्या कारणे । ते नष्ट नाही ॥१८॥
ऐशा या असणेपणात । पंचमहाभुते प्रकटतात । आणि जीव जे जन्मतात । ते अध्यात्म गा ॥१९॥
खेळ जैसा गगनीचा । नाना प्रकारच्या ढगांचा । भास तो गुण आकाराचा । होई तेथे ॥२०॥
जे असे शुद्ध ब्रह्मपण । तेथे होई पंचभुताचं प्रकटन । मग गुण आकार भासणं । घडे तेथे ॥२१॥
ऐसे त्या निर्विकल्प भूमीत । संकल्पांचे अंकुर असती फुटतं । मग अखिल प्राणिजात । निर्माण होते ॥२२॥
एकेकाच्या आत । ब्रह्मच भरलेलं असतं । प्राणी इतके अगणित । मोजले न जाती ॥२३॥
त्या जीवांच्या ठिकाणी । होई संकल्पांची उभारणी । मग भवचक्राची रहाटणी । अखंडित ॥२४॥
जेथे होते अद्वैत । प्रकटले तेथे द्वैत । मग भासे अनेकत्व । चोहीकडे ॥२५॥
सम विषमत्वाची पेरणी । या जगताच्या ठिकाणी । लक्ष लक्ष योनी । प्रकटल्या येथे ॥२६॥
ऐसी असंख्य जीवांची उपजणी । न होय जयाची मोजणी । उत्पत्ती शून्याच्या ठिकाणी । झाली ऐसी ॥२७॥
तेथे नसे कोणी कर्ता । कारणही नसे तत्त्वतः । परि कार्याची ती व्याप्तप्ता । आपैसीच ॥२८॥
ऐसा कर्त्यावीण साकार । अव्यक्ती प्रकटला आकार । ऐसा जो व्यापार । तया नाम कर्म ॥२९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आता काय ते अधिभूत । सांगतो मी थोडक्यात । जे दिसतं आणि हारपतं । अभ्र जसं ॥३०॥
तयाचे भासणे लटिकेच । नसेच ते बा साच । हे नाटक पंचभूतांचं । आहे अर्जुना ॥३१॥
पंचमहाभूताकारण । सृष्टीचं ते भासणं । नामरुपाचं ते प्रकटन । भास अवघा ॥३२॥
ऐसा नामरुपाचा संघात । तयांनाच म्हणती अधिभूत । सर्व अधिभूतांना जे असे जाणत । ते अधिदैव ॥३३॥
आणि साक्षी या शरीराचा । अध्यक्ष मनइंद्रियांचा । आधार जो वासनांचा । या जगती ॥३४॥
परमात्म्याचाच अवतार । परि बनला तो अहंकार । सर्व भ्रमाचा व्यापार । ज्याचे ठायी ॥३५॥
जीव अधिभुतासीच म्हणतात । जे अधिदैवच असे असत । पृथकपण असे नांदत । तयाचे ठायी ॥३६॥
या अधिभुताच्या ठिकाणी । जी जीवपणाची उपजणी । तोच अधियज्ञ जाणी । अर्जुना तू ॥३७॥
येर अधियज्ञाधिभूत । तेही मीचि कीर समस्त । जसे इतर धातू असती मिसळत । सोन्यामाजी ॥३८॥
तरी सोन्याचे सोनेपण न मळे । शुद्धपण सदैव राही वेगळे । परि इतर धातुचेनी मेळे । हिणकसपणा ॥३९॥
तैसे अधिभुतादि भासणे । हे अविद्येचेनी कारणे । द्वैत भ्रमाकारणे । वेगळे भासती ॥४०॥
अविद्या ती संपता । द्वैताची संपते कथा । प्रकटता ती अद्वैतता । एक सारे ॥४१॥
घेऊनी केसाचा गुंडाळा । त्यावर ठेवता स्फटिकशिळा । पाहता ती डोळा । भेदली भासे ॥४२॥
ते केस काढून घेता । संपते ती भेदता । पहा ती एकसंधता । आधीच होती ॥४३॥
स्फटिक अखंडचि असे । केसाकारणे भेदले भासे । केस दूर जातासरीसे । अखंडपण ॥४४॥
तैसे अहंभाव जरी जाये । तरी ऐक्य ते आधीच आहे । ऐसा अनुभव जेथे ये । तो अधियज्ञ मी ॥४५॥
अर्जुना पहा मी तुजला । जो सकळ कर्मयज्ञ सांगितला । मज मनी हेतू एकला । आत्मज्ञानाचा ॥४६॥
जो सकळ जीवांचा विसावा । नैष्कर्म्य सुखाचा ठेवा । परि उघड करुनी पांडवा । दाविला तुज ॥४७॥
पेटवून वैराग्याचे इंधन । करावे पंचविषयांचे हवन । यज्ञ जो इंद्रिय संयमन । होऊ द्यावा ॥४८॥
वज्रासनी बसून । आधारमुद्रा शोधून । वेदी शरीरमनाची करून । यज्ञ करावा ॥४९॥
संयम अग्नीच्या कुंडात । इंद्रिय विषय टाकावेत । समत्वात स्थिर रहात । यज्ञ करावा ॥५०॥
मनाचे करून संयमन । भ्रमाचे होऊ द्यावे हवन । ऐसा ज्ञानयज्ञ करणं । कल्याण अर्जुना ॥५१॥
घडता अहंभावाचे समर्पण । प्रकटते ते ज्ञान । मग ज्ञेय आणि ज्ञान । भिन्न नाही ॥५२॥
ऐसे हे ज्ञान । सांगितले भगवंतानं । आणि त्या अर्जुनानं । ते ग्रहण केले ॥५३॥
हे सर्व जाणून । संतोषला तो भगवान । आणि तृप्ती पावला अर्जुन । त्यायोगे ॥५४॥
मुलाच्या त्या तृप्तीकारण । मातेनेही तृप्त होणं । वा होता शिष्यासी ज्ञान । तृप्त गुरू ॥५५॥
हे सर्व पाहून । सात्त्विक भाव आला दाटून । परी समत्व ते साधून । राहिला स्थिर भगवान ॥५६॥
सुगंध पिकल्या सुखाचा । वा कल्लोळ जो अमृताचा । बोल तैसा कोमल स्वराचा । बोलला भगवान ॥५७॥
ऐसे संपता ते अज्ञान । आपसुक विरते ते ज्ञान । मग ज्ञान आणि अज्ञान । दोन्ही नाही ॥५८॥
जे आताचि सांगितले होते । अधियज्ञ म्हणती जयाते । संपूर्ण जाणुनि तयाते । ते मीच होती ॥५९॥
ते देहास खोळ मानती । आपण आत्मतत्त्वातच रहाती । जैसे घटमठ रहाती । गगनाठायी ॥६०॥
ऐसी प्रतिती येता । प्रकटते ती निश्चिंतता । म्हणून ती द्वैतता । नाही तेथे ॥६१॥
ऐसे सबाह्य ऐक्य होता । मीची होऊनी रहाता । मग पंचभुतांशी तादात्म्यता । तेथे नाही ॥६२॥
देहपणी नाही देहाचे भान । तेथे मरणाची चिंता कवण । जे जे घडे अनुभवणं । ते रागद्वेषावीण ॥६३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसी ऐक्याची वार्ता । हृदयी प्रकटली असता । विश्वासी ती एकरूपता । भंगेच ना ॥६४॥
घट जो पाण्यात बुडाला । तो आत बाहेर उदकीच ठेला । आणि घट जरी फुटला । तरी पाणी अभंग ॥६५॥
सापाने कात टाकली । वा एखाद्याने वस्त्रे फेडिली । शरीराची का हानी झाली । कधी त्याच्या ॥६६॥
तसे आकार जरी नष्ट झाले । तरी सर्वत्र असे ते संचले । सर्वत्र असे जे भरले । ओतप्रोत ॥६७॥
येता जवळ मरण । जे ठेवतात अवधान । ते एकत्व मजसी पावून । मुक्त होती ॥६८॥
एऱ्हवी तरी साधारण । आले असता मरण । जी वासना धरे अंत:करण । तेचि होई ॥६९॥
जैसा कोणी एक जन । पळतसे भयग्रस्त होऊन । चुकविण्या मरण । विहिरीत पडे ॥७०॥
तया पडण्याशिवाय । नसतोच काही उपाय । मग पडणे ते होय । अनिवार्य तेथे ॥७१॥
तैसे मृत्यूसमयी ते । जे मनी बा प्रकटते । तेच व्हावे लागते । जीवा आपोआप ॥७२॥
जैसे ती जागताना । मनी असे जी भावना । तीच येई मग स्वप्ना । डोळा लागता ॥७३॥
जे आवडे जिवंतपणी । तेच आठवे मरणक्षणी । मग तैसीच ती योनी । पावे तया ॥७४॥
आणि मरणी जया जे आठवे । तो तेचि गतीते पावे । म्हणोनि सदा स्मरावे । मला तू ॥७५॥
जे डोळ्याने दिसते । वा कानी ऐकू येते । मनी जे भासते । वा मुखी प्रकटते ॥७६॥
ते आत बाहेर आघवे । मीच ऐसे अनुभवावे । ऐसे व्हावे स्वभावे । मीच अर्जुना ॥७७॥
अर्जुना ऐसे होता । नच मरतो तो देह जाता । मग युद्ध ते करता । भय कैसे ॥७८॥
मजसी मनबुद्धि अर्पिता । पावशील मजसी एकरूपता । अर्जुना तीच बा ब्रह्ममयता । वचन माझे ॥७९॥
हे खरे कशावरुनी । ऐसा संदेह जर तुज मनी । मग प्रथम ते अनुभवूनी । बोलावे अर्जुना ॥८०॥
योग घडे अभ्यास करता । चित्तासी प्रकटता अवधानता । पांगळाही जिंके पर्वता । मनी असता तळमळ ॥८१॥
ऐसी असावी निरंतर । आत्मतत्त्वाची ओढ अपार । असो वा नसो शरीर । जाण अर्जुना ॥८२॥
चित्त जे नाना गती पावते । ते जेव्हा आत्मतत्त्वास वरते । मग ते विसरते । देह मना ॥८३॥
जैसी ती सरिता । सागरासी ती मिळता । नच पाहे वळून मागुता । काय चालले ॥८४॥
सागरी मिसळून सागराचि होता । चित्त चैतन्यी विरता । भवचक्राची व्यथा । संपून जाई ॥८५॥
जयाचे आकारावीण असणे । जया जन्म न निमणे । जे आघवेचि आघवेपणे । देखते असे ॥८६॥
जे जुने गगनाहून । नि सूक्ष्म परमाणुहून । जयाच्या कारण । विश्वनिर्मिती ॥८७॥
जेथून सर्व सृष्टी प्रकटते । जया कारणे सृष्टी चालते । ऐसे मनातीत ते । तत्त्व साक्षी ॥८८॥
जशी वाळवी न लागते अग्नीस । वा अंधार न झाकळे प्रकाशास । तैसे मनबुद्धिइंद्रियास । अगम्य ते ॥८९॥
ऐसी दिव्य प्रकाशाची रास । जी न मावळे वा ये उदयास । ती त्या ज्ञानी जनास । अनुभवा येते ॥९०॥
ऐसी परिपूर्ण ब्रह्ममयता । मरणकाळी ती स्मरता । चित्तासी ठेवता समता । योग घडे ॥९१॥
बाहेर पद्मासन रचुनी । उत्तराभिमुख बैसोनी । समता ठेवूनी मनी । तो स्थिर राही ॥९२॥
मग मनोधर्म ते सांडत । स्वरूपी अवधान ठेवत । असे भ्रमाच्या पार जात । योगी अर्जुना ॥९३॥
योगासी त्या जाणुनी । मन सम्यकतेच्या मार्गानी । निघे मूलाधारापासूनी । ब्रह्मरंध्रापर्यंत ॥९४॥
अचेतन पार करत । भ्रमाचा मांडव मोडत । प्रवेशे मग गगनात । अनायासे ॥९५॥
ऐसे मन स्थिर करता । मनी भाव तो असता । मजसी एकरूप पावता । योग घडे ॥९६॥
ऐसे मनइंद्रियासी सोडत । भ्रुकुटीसी चित्त ठेवत । तो लीन पावे ब्रह्ममयतेत । आपैसा ॥९७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

घटी जो दिवा झाकला । तो केव्हा शांत झाला । हे जसे समजेच ना कोणाला । तैसा देह ठेवी ॥९८॥
तो केवळ परब्रह्म । जया परमपुरुष ऐसे नाम । ते माझे निजधाम । होऊनी ठाके ॥९९॥
जे परिशुद्ध ज्ञान । जे जाणिवेचे उगमस्थान । तया म्हणती ज्ञानीजन । अक्षर ऐसे ॥१००॥
मोडे न जे झंझावाते । गगनाही जे पहाते । ते न कधीच मोजता येते । ते ब्रह्म ॥१०१॥
विषया ते जाणते । परि स्वत:ची जाण नसते । ऐसे अद्वैत तत्त्व ते । तेचि अक्षर ॥१०२॥
म्हणून वेदविद नर । म्हणती जयाते अक्षर । असे जे पंचभुता पार । परमात्म रूप ॥१०३॥
देहात जरी असले । इंद्रियांचे विष सोडले । मनइंद्रियांसी ओलांडले । त्यांनी अर्जुना ॥१०४॥
ऐसे जे असती विरक्त । तया अंतरीच ब्रह्म प्रकटतं । निष्काम मनीच असे येत । अनुभूती त्याची ॥१०५॥
जयाच्या आवडीने । ते ब्रह्मचर्यही पाळणे । आणि इंद्रियासही न जुमाने । तो योगी ॥१०६॥
ऐसे ते पद । दुर्लभ आणि अगाध । जया वर्णण्या वेद । आतुर असती ॥१०७॥
ते योगी ऐसे ब्रह्म होती । जे ऐसे लया जाती । तयाची ती महती । सांगतो पहा ॥१०८॥
मग अर्जुन म्हणे भगवंतासी । हेच आले होते मज मनासी । त्या ब्रह्ममयतेसी । वर्णावे अजुनी ॥१०९॥
परि बोलावे ते अति सोपे । तेथ म्हणितले त्रिभुवनदीपे । तेच आता संक्षेपे । सांगतो तुजला ॥११०॥
बहिर्मुखतेची सवय सोडून । मन अंतर्मुख करून । जावे अंतरंगी विरून । अर्जुना आता ॥१११॥
हे तेव्हाच घडते । जेधवा मनी समत्व असते । नि इंद्रियासी तादात्म्य ते । नसते अर्जुना ॥११२॥
जे मन अंतर्मुख होते । ते हृदयातच रहाते । जैसे अपंग घरा ते । न सोडती बघा ॥११३॥
ऐसे अंतर्मुख होऊन । मनाने करावे मनाचे निरीक्षण । मन निष्काम होणं । तेचि ध्यान ॥११४॥
मग स्वप्न सुषुप्तीस ओलांडून । जावे तुर्येत मिसळून । तेचि गगनी गगन होणं । जसे अर्जुना ॥११५॥
ऐसा गगनी लय होणं । तेच ओंकार साधणं । निराकारी एकत्व पावणं । ज्ञान अर्जुना ॥११६॥
ऐसा लय होणं । तेच ब्रह्ममयतेचं प्रकटणं । निराकार निर्गुण होणं । कल्याण अर्जुना ॥११७॥
यासीच प्रणव नाम । जे एकाक्षर ब्रह्म । जे माझे स्वरुप परम । जाण अर्जुना ॥११८॥
ऐसे त्यागणे देहाते । तो शुद्ध होऊनी पावे माते । जया प्राप्तव्य दुसरे ते । उरत नाही ॥११९॥
जर शंका तुझ्या मना । अंतकाळी मी कैसा येईल स्मरणा । तर मग अर्जुना । ऐक आता ॥१२०॥
मृत्युकाळ तो येता । इंद्रिय ती आकसता । जीव तो सुटू जाता । स्मरण कैसे ॥१२१॥
ते वेळी कैसे सजग असणे । नि निर्विकल्प ते होणे । नि कैसा अंत:करणे । तू स्मरावा ॥१२२॥
ऐसा या शंकेस । थारा नको तू देऊस । मी येतो तयांच्या मदतीस । जया ओढ माझी ॥१२३॥
मन निर्विकल्प होता । मनइंद्रियांशी तादात्म्य तुटता । तुर्येत प्रवेश करता । प्राप्ती माझी ॥१२४॥
माझीया आवडीकारणे । तहानभूक न आठवणे । मजसाठी अखंड तळमळणे । फलदायी अर्जुना ॥१२५॥
ऐसे मज नित्य जे स्मरतात । मग ते मीच बा होतात । एकत्व पावून माझ्यात । ते मुक्त होती ॥१२६॥
होत असता देहावसान । जया येते माझी आठवण । मग मी प्रसन्न होणं । नवल नाही ॥१२७॥
एक आर्त बिचारा तो । अंती धाव धाव म्हणतो । तयासाठी मीही कळवळतो । नि धाव घेतो ॥१२८॥
दुर्दशा जर झाली भक्तांची । तर मग भक्ती काय कामाची । म्हणून ऐशा शंकेची । गरज नाही ॥१२९॥
जे वेळी तयानी स्मरावे । ते वेळी मी तया पावावे । हे होतसे आघवे । आपोआप ॥१३०॥
भक्तांचे ऋण माझ्यावर । तया मी का नाही पावणार । करणे तयांचा उद्धार । कर्तव्य माझे ॥१३१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

देह सुटत असता । दु:ख होते त्या जीविता । त्या दु:खाची ती वार्ता । मी दूर करी ॥१३२॥
माझे करणे निष्काम स्मरण । तेचि बा नामस्मरण । मग मजसी एकत्व पावणं । आपोआप ॥१३३॥
म्हणून देहांतीचे साकडे । माझीया भक्तां न पडे । मृत्यूसमयी ते निष्काम बापुडे । मिळती मजसी ॥१३४॥
देहाची खोळ फेडून । मन निष्काम करून । सुषुप्तीस त्या तोडून । ते मिळती मजसी ॥१३५॥
आणि या भक्ता ते । देहीचे तादात्म्य नसते । म्हणून मरण समयाते । दु:ख नाही ॥१३६॥
देहांती मी यावे । नि मजसोबत न्यावे । हेही नाही स्वभावे । घडते सारे ॥१३७॥
या शरीराच्या आत । जे मीपण असे नांदत । तया नाही कधीच अंत । जाण तू अर्जुना ॥१३८॥
ऐसे जे नित्ययुक्त । तयासी सुलभ मी सतत । म्हणवूनि देहांती निश्चित । मीच होती ॥१३९॥
देहक्लेशाची ती वाडी । तापत्रयाची शेगडी । मृत्यूच्या त्या दाढी । घास जैसा ॥१४०॥
जे दैन्य दु:खाचे दुभते । जे महाभयाते वाढवते । सकल दु:ख भयाचे पुरते । भांडवल जे ॥१४१॥
जे दुर्मतीचे मूळ । जे कुकर्माचे फळ । जे भ्रमाचे केवळ । स्वरूप असे ॥१४२॥
जो संसाराचा आधार । उद्यानरूपी विकार । सकळ रोगांचे माहेर । शरीर आहे ॥१४३॥
जे काळाचं अन्न उष्ट । आशेचा जो पाट । जन्ममरणाचा तो थाट । शरीर अर्जुना ॥१४४॥
जे भ्रमाचे भांडे । विकल्पांचे ते लोंढे । नि विंचवांचे तांडे । शरीर आहे ॥१४५॥
जे व्याघ्राचे क्षेत्र । नि वारांगनेचे मैत्र । इंद्रिय वासनेचे यंत्र । शरीराठायी ॥१४६॥
जो चेटकिणीचा कळवळा । घट्ट झालेला विषाचा गोळा । चोराचा जिव्हाळा । शरीर बा ॥१४७॥
ते कुष्ठरोगाचे आलिंगन । काळसर्पाचं ते मृदुपण । नि पारध्याचे गायन । शरीर ते ॥१४८॥
हा वैऱ्याचा पाहुणचार । नि दुर्जनांनी दिलेला आदर । हा आहे सागर । अनर्थाचा ॥१४९॥
जे स्वप्नीचे ही स्वप्न । मृगजळी जसे सिंचले वन । गगनातील धूम्रकण । शरीर तैसे ॥१५०॥
ऐसे हे जे शरीर । तया न पावती ते नर । जे होऊनी ठेले अपार । स्वरूप माझे ॥१५१॥
ब्रह्मलोकीही जन्म घेता । न चुकेच जन्ममरण व्यथा । परी मज स्वरूपी विरता । दु:ख नाही ॥१५२॥
जसे जागल्या नंतरी । कोण बुडतो स्वप्नीच्या महापुरी । तैसे मजसी एकत्व अंतरी । मुक्तिदायी ॥१५३॥
विश्वामाजी अलौकिक । जो भासे चिरकालिक । पहा तो ब्रह्मलोक । कैसा आहे ॥१५४॥
ब्रह्मलोकीचा एक प्रहर । एवढाच स्वर्गीच्या इंद्राचा वावर । होती ब्रह्मलोकीच्या दिवसभर । चवदा इंद्र ॥१५५॥
चार युगांच्या फेऱ्या हजार । तो ब्रह्मदिवसाचा आकार । आणि तेवढीच ती अपार । रात्र त्याची ॥१५६॥
एवढे अहोरात्र जेथीचे । तेवढे आयुष्य असते जयांचे । म्हणती तया स्वर्गीचे । चिरंजीव ॥१५७॥
इतर देवतांची नवलाई । विशेष सांगावी काई । इंद्राचीच दशा पाही । जे दिवसाचे चौदा ॥१५८॥
ब्रह्माच्या आठा प्रहरासी । जे पहातात आपुल्या डोळ्यासी । म्हणतात तयासी । ज्ञानी अर्जुना ॥१५९॥
ऐशा ब्रह्मदिवसा पहाता । न ये तयासी मोजता । अव्यक्ता येते व्यक्तता । तेव्हा अर्जुना ॥१६०॥
पुढे चार प्रहरानं । होई आकारांचं आटणं । मग होतसे पुन्हा प्रकटन । पहाट होता ॥१६१॥
शरद ऋतीची होता सुरवात । जसं अभ्र आकाशी जिरतं । आणि होता ग्रीष्मांत । प्रकटे पुन्हा ॥१६२॥
तैसी ब्रह्मदिनात । सृष्टी असे नांदत । अन् चार युगांच्या हजार फेऱ्यात । फिरत राही ॥१६३॥
मग ब्रह्मरात्रीची वेळ येते । आणि विश्व अव्यक्ती लया जाते । सहस्त्रयुगा अंते । पहाट होई ॥१६४॥
हे सांगायचे काय कारण । जगाची उत्पत्ती लय होणं । हे ब्रह्माच्या दिवसरात्री कारण । होत असे ॥१६५॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पहा काय ते नवल । जो सृष्टीचे बीज केवल । तोच उत्पती लयाने विव्हल । झाला असे ॥१६६॥
एऱ्हवी त्रैलोक्य हे धनुर्धरा । ब्रह्मगावीचा जो पसारा । उत्पती लयाच्या प्रकारा । बांधला असे ॥१६७॥
मग ब्रह्मरात्रीचा समय येता । सृष्टी लय पावता अव्यक्ता । तिचे नाव साम्यावस्था । जाण अर्जुना ॥१६८॥
जैसे वृक्षपण बीजासी आले । की मेघ हे गगन जाहले । तैसे जेथे अनेकत्व सामावले । ते साम्य अर्जुना ॥१६९॥
जेथ सम विषम न दिसे काही । म्हणून भुते ही भाषा नाही । जेवि दूध जाहलीया दही । दूध कोठे ॥१७०॥
तेवि आकार तो लोपता । लोपे जगाची व्यक्तता । आणि ती ब्रह्मता । तिचेच ठिकाणी ॥१७१॥
तया म्हणती जरी अव्यक्त । तेच होत असे व्यक्त । व्यक्त आणि अव्यक्त । भिन्न नाही ॥१७२॥
सुवर्णाअलंकार आटविता । सोन्यासी ये लगडता । घडवता ती लगडता । अलंकार होई ॥१७३॥
हे जसं होणं जाणं । एका सुवर्णाकारण । तैसे सृष्टी व्यक्त अव्यक्त होणं । ब्रह्माठायी ॥१७४॥
ते तरी व्यक्त ना अव्यक्त । नित्य ना नाशवंत । या दोहो भावा अतीत । अनादि सिद्ध ॥१७५॥
जे विश्वच होऊन नांदते । ते विश्व नसता ही असते । जैसे अक्षर पुसल्या ते । न नासे अर्थ ॥१७६॥
तरंग असती होत जात । परी पाणी अखंडच असतं । भुते जरी असती नाशवंत ।ते तत्त्व अविनाशी ॥१७७॥
जैसे अलंकार जरी आटवता । न आटते ती सुवर्णता । तैसे जीव तो मरता । आत्मतत्त्व अमर ॥१७८॥
ते मन बुद्धीस नाही आकळत । म्हणून तया अव्यक्त म्हणतात । इंद्रियाच्या ही आवाक्यात । नाही ते ॥१७९॥
ते आकारा जरी आले । तयाचे निराकारपण नच मोडले । आणि आकार जरी लोपले । तरी ते नित्य ॥१८०॥
प्रसिद्ध जे अक्षर म्हणून । तेचि असे ज्ञान । घडे मनइंद्रिय बुद्धिसी जाणणं । त्याचेच कारणे ॥१८१॥
या अवघ्या देहात । सुप्त असे ते अव्यक्त । जे न काही करवी वा करवीत । या प्रपंची ॥१८२॥
या प्राण्यांच्या चेष्टात । तो नाहीच कधी सापडत । इंद्रिये ती करतात । व्यवहार त्यांचा ॥१८३॥
मनविषयांची होता चलती । मीपणाची येते भरती । मग सुखदु:खाची ती अनुभूती । मना येते ॥१८४॥
राजा काहीच न करतो । परि देशाचा व्यापार चालतो । तसा मनाचा व्यवहार चालतो । मनाठायी ॥१८५॥
तैसे अहंकाराचे भासणे । जे मनाचे देणे घेणे । आणि इंद्रियांचे ते वर्तणे । अहंकाराठायी ॥१८६॥
ही देहक्रिया आघवी । न करताच होय बरवी । जैसे सूर्य न चालवी । या लोका ॥१८७॥
ज्ञानी तया जाणतात । जो झोपला आहे शरीरात । तया पुरुष गा म्हणतात । बा अर्जुना ॥१८८॥
या पुरुषाचे प्रकृतिसोबत नांदणे । नि प्रकृतिशी एकनिष्ठ रहाणे । या एकनिष्ठतेकारणे । तो पुरुष गा ॥१८९॥
वेद त्रिगुणाची खाण । म्हणून देखेच ना पुरुषाचे अंगण । ते हे गगनाचे पांघरूण । होय अर्जुना ॥१९०॥
ज्ञानीच यासी जाणती । परात्पर तयाते म्हणती । ऐसी जी अनन्यगती । तोच पुरुष अर्जुना ॥१९१॥
जे तनु वाचा चित्ते । ना ऐकती दुजीये गोष्टीते । ते या अनन्यगतीते । प्राप्त होती ॥१९२॥
हे त्रैलोक्यच पुरुषोत्तम । ऐसा जयांचा मनोधर्म । त्या अस्तिकांचा आश्रम । अर्जुना हा ॥१९३॥
जे निगर्वाचे गौरव । जे निर्गुणाची जाणीव । जे सुखाची राणीव । तो पुरुष हा ॥१९४॥
जे संतोषाचे ताट । नि अनाथांचे मायपोट । ज्ञानी भक्तांचा तो थाट । याचि गावा ॥१९५॥
हे एकेक काय सांगावे । अंतरीच ते अनुभवावे । तेथे जाऊनि तेच व्हावे । ऐसे ते अर्जुना ॥१९६॥
जसं थंड हवेच्या झुळकेनं । उष्ण उदक थंड होणं । वा प्रकाश होणं अंधारानं । येता समोर सूर्य ॥१९७॥
तैसा संसार या गावा । गेला असता पांडवा । होऊनी ठाके आघवा । मोक्षचि तो ॥१९८॥
जसे जे अग्निमाजी आले । ते इंधनच अग्नी झाले । पाठी काहीच न उरले । ते काष्ठपण ॥१९९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऊसापासून प्रकटते साखरता । कितीही बुद्धि चालवता । साखरेचा ऊस करू जाता । न होय कधी ॥२००॥
त्या परिसाचे कारणे । लोखंड सुवर्ण होणे । त्या सुवर्णाचे पुन्हा लोखंड होणे । अशक्य अर्जुना ॥२०१॥
जैसे त्या दुधातून । होय तुपाचे प्रकटन । मग त्या तुपाचं दूध होणं । नाही अर्जुना ॥२०२॥
ऐसे ते परम । जे आहे माझेच निजधाम । तयाचे ते गुह्य वर्म । सांगितले तुजला ॥२०३॥
आणिकही एका प्रकारे । मोक्ष जाणता येतो रे । देह ठेवण्याच्या अवसरे । सजग रहाता ॥२०४॥
जर ऐसा प्रसंग झाला । असजगतेत देह सांडला । मग तो पुन्हा जन्मासी आला । आपोआप ॥२०५॥
जे शुद्ध काळात देह ठेवतात । ते तत्क्षणी ब्रह्म होतात । अन्यथा जन्म घेतात । मरता अशुद्ध काळी ॥२०६॥
तैसी मुक्ती आणि जन्ममरण । दोन्ही समयाच्याच अधीन । त्या समयाचं वर्णन । ऐक आता ॥२०७॥
येता मरणाची ती गती । श्वास उच्छ्वास ते थांबून जाती । मग पंचभुते ती मिसळती । पंचभुतात ॥२०८॥
ऐशा या प्रयाणकाळी । भ्रम जर बुद्धिस न गिळी । स्मृतीही न होता आंधळी । असावी सावध ॥२०९॥
हा चेतना वर्ग आघवा । मरणी दिसे टवटवा । परि पूर्वीच्याच त्या ब्रह्मानुभवा । कारण अर्जुना ॥२१०॥
ऐसे ते सजग असणे । नि सजगतेत देह सोडणे । ऐसे सर्व ते होणे । अग्निच्याच कारण ॥२११॥
पहा वाऱ्याने वा उदकाने । घडता दिव्याचे ते विझणे । मग न घडेच ते दिसणे । असताही दृष्टी ॥२१२॥
तैसे बा देहांती । घडे त्रिदोषांची व्याप्ती । तेथे अग्नीची समाप्ती । घडे अर्जुना ॥२१३॥
ते वेळी प्राणासी प्राण नाही । बुद्धि असून करील काई । म्हणून अग्निवीण देही । नाही चेतना ॥२१४॥
ऐसा देहीचा अग्नी जर गेला ।मग तो देह नव्हे चिखल ओला ।जया बेहोषीने असे गिळला ।तेव्हा अर्जुना ॥२१५॥
मग न राही काही स्मरण । सगळेच तेथे अनवधान । अनवधानी देहत्याग घडणं । अकल्याणकारी ॥२१६॥
तव त्या कफाचे चिखली । चेतनाच बुडोनि गेली । मग त्या जिवाची नाव बुडाली । भवसागरात ॥२१७॥
आधीचा अभ्यासू जो केला । तो मरणकाळी कामा न आला । जैसे दिवा मालवला । पोचण्याआधी ॥२१८॥
आता असो हे सकळ । जाण पा ज्ञानासी अग्नी मूळ । प्रयाण समयी अग्नीचे बळ । असावे पूर्ण ॥२१९॥
आत अग्निज्योतीचा प्रकाश । बाहेर शुक्लपक्ष आणि दिवस । आणि षण्मासातील मास । उत्तरायणी ॥२२०॥
ऐसा योग जे साधती । नि साधोनि देह ठेवती । ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ॥२२१॥
ऐक गा धनुर्धरा । एवढे सामर्थ्य या अवसरा । जाण्या त्या स्वपुरा । मार्ग सहज ॥२२२॥
येथे अग्नी ही पहिली पायरी । ज्योती प्रकाश दुसरी । दिवस असणे तिसरी । नि चौथी शुक्लपक्ष ॥२२३॥
आणि षण्मास उत्तरायण । हाच गा तो सोपान । येणे सायुज्यता पावणं । घडे अर्जुना ॥२२४॥
हा उत्तम काल जाणिजे । याते अर्चिरा मार्ग म्हणिजे । आता अयोग्यकाल तो सहजे । सांगेन तुजला ॥२२५॥
जर प्रयाणाचिया अवसरे । कफ वात उभरे । तेणे अंत:करणी अंधारे । कोंदले ठाके ॥२२६॥
सर्वेंद्रिया लाकूड पडे । स्मृतिभ्रमांमाजी बुडे । मन होय वेडे । कोंडे प्राण ॥२२७॥
अग्नीचे अग्नीपण जाये । मग तो धूरचि अवघा होये । मग चेतना कुंठीत होये । शरीराची ॥२२८॥
जैसे अभ्र ते येता । नि चंद्र त्या आड लपता । मग ती प्रकाशता । झावळी-झावळी ॥२२९॥
जर सावध न मेला । जीव जो बेशुद्ध झाला । मग जाणे पुन्हा भवचक्राला । घडे तेथे ॥२३०॥
ऐसे इंद्रिय बुद्धि मन । तया भोवती अज्ञानाचे कोंदण । होता अवधानाचे विस्मरण । जन्म घडे ॥२३१॥
ऐसे अवधान ते संपता । पूर्वाभ्यास कामा न येता । मरणाची गाठ पडता । दुर्दैव अर्जुना ॥२३२॥
देहा आत ऐसी स्थिती । बाहेर कृष्णपक्ष वर राती । आणि दक्षिणायन सोबती । त्याच्या अर्जुना ॥२३३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसी पुनरावृत्तीची घराणी। एकवटती जयाच्या प्रयाणी। तेथे स्वरूपसिद्धीची कहाणी। घडेल कैसे ॥२३४॥
ऐसा जयाचा देह पडतो। तो योगी चंद्रलोकी जातो। नि मागुती मग येतो। पृथ्वीलोका ॥२३५॥
अयोग्य समय जो मृत्यूला। तो मी बघ तुज सांगितला। प्राप्त होता तेव्हा मरणाला। पुनरावृत्ती घडे ॥२३६॥
आचरून अर्चिरा मार्गाला। जाणे उत्तम ते मोक्षाला। तो सोपा आणि चांगला। निवृत्ती मार्ग ॥२३७॥
या दोन्ही वाटा अनादि तू जाण।एक सोपी नि दुसरी कठीण।सांगितल्या दोन्ही समजावून।तुज अर्जुना ॥२३८॥
सोपे कठीण मार्ग ओळखावे। सत्य असत्य ते जाणावे। अहित हित ते पहावे। आपले आपण ॥२३९॥
नाव असूनही चांगली।कोणी का प्रवाही उडी घाली।राजमार्ग सोडून जाणे आडपावली।अयोग्य अर्जुना ॥२४०॥
जो विष अमृत ओळखतो। तो अमृत का कधी सोडतो।जो सोपा मार्ग ओळखतो। तो न जाई आडमार्गी ॥२४१॥
बा अर्जुना म्हणून। घ्यावे सर्व पारखून। मग न पडे पस्तावणं। सजग रहाता ॥२४२॥
धूम्रमार्ग अतिकठीण। देहांती तो टाळून। आयुष्यभराचं ते साधन। न घालवावे वाया ॥२४३॥
जर अर्चिरा मार्ग चुकलिया। आणि धूम्रपंथे पडलिया। या संसारचक्रा गुंतलिया। दु:ख अर्जुना ॥२४४॥
जाणोनी धूम्रमार्गाची कठीणता। दोन्ही मार्ग ते अवलोकिता। अर्चिरा मार्ग अंगीकारता। कल्याण होई ॥२४५॥
ऐसे ते ब्रह्ममय होणे। वा पुनर्जन्मा येणे। मृत्यूसमयी ते घडे दैवाकारणे। जाण तू अर्जुना ॥२४६॥
मग भगवंत म्हणाला। का जावे कठीण त्या मार्गाला। प्राप्त होणे ब्रह्मभावाला। कल्याणकारी ॥२४७॥
मनी संपतो लोभ देहाचा। अंतरी अनुभव येता ब्रह्ममयतेचा। मग न येई भास सर्पत्वाचा। दोरीस कधी ॥२४८॥
तरंगपणाचा तो आभास। नाही कधीच पाण्यास। पाणी पाण्याच्याच ठायास। सदैव अर्जुना ॥२४९॥
तरंग होता न जन्मणे। तरंग लोपता न मरणे। तैसे सदैव ब्रह्मत्वी वास करणे। ब्रह्म होऊनि ॥२५०॥
आता शरीराचे ठायी। तया तादात्म्य नाही। मग शरीराच्या नाशापायी। दु:ख कैसे ॥२५१॥
आपणचि ते ब्रह्म व्हावे। मग पुनर्जन्म कासाया अनुक्रमावे। देशकालादि आघवे। व्हावे आपणच ॥२५२॥
हा घट जेव्हा फुटे। त्यातील आकाश लागे नीट वाटे। मगच ते गगना भेटे। एव्हवी चुके ॥२५३॥
ऐसे का काही आहे। कि फक्त आकारच तो जाये। एरवी गगन गगनीच आहे। घटा आधी ॥२५४॥
ब्रह्म बोधाचेनि पाडे। मार्गामार्गाचे कोडे। ते ब्रह्मज्ञान्या न पडे। योगीयासी ॥२५५॥
या कारणे अर्जुना। तू प्राप्त व्हावे ब्रह्मज्ञाना। तोडूनि सर्व द्वैत बंधना। अद्वैत व्हावे ॥२५६॥
मग सर्व ठिकाणी। ब्रह्मभाव अनुभवूनि। देही अथवा मरणी। तटस्थ तो ॥२५७॥
तो कल्पासोबत न जन्मतो। कल्पांती न तो मरतो। भवचक्रात न तो फसतो। कदापिही ॥२५८॥
ऐशा प्रकारे जो योगी होतो। तयासीच ब्रह्म बोध असतो। भवचक्रास संपवून तो। ब्रह्मलीन असतो ॥२५९॥
राज्य जे इंद्रादिकांचे। जाणून ते बिनकामाचे। लाथाडून सुख भोगांचे। तो मुक्त होतो ॥२६०॥
जाणून ते वेदाध्ययन। वा यज्ञाचे ते आयोजन। तप दानाचे ते पुण्य। तोकडे तेथे ॥२६१॥
बेरीज या सर्व पुण्याची। ती न करे बरोबरी ब्रह्माची। ऐसी महती मुक्तीची। आहे अर्जुना ॥२६२॥
ऐसे जे मनइंद्रियातीत। जे असे तुलनेच्याही अतीत। वेद यज्ञ तपाची बात। न जाणे तया ॥२६३॥
जे विटे ना सरे। भोगाची इच्छाच नुरे। ऐसे महासुखाचे सोयरे। जोडले त्याने ॥२६४॥
ऐशा सुखाचं प्रकटणं। जे अद्वैती एकरूप होणं। ते करता शंभर यज्ञ आयोजन। प्राप्त नाही ॥२६५॥
ऐसे सावध ते होऊन। भोगसुखाचे अनुमान घेऊन। तया नाशवंत जाणून। त्यागती योगी ॥२६६॥
सर्व सुखासी जाणून। तया पायानी लाथाडून। ब्रह्ममय होऊन। राहती योगी ॥२६७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे सर्व सृष्टीचे भाग्य । ब्रह्म शंकरा आराधनायोग्य । योगीयांचे भोग्य । भोगधन जे ॥२६८॥
जो सकळ कळांची कळा । जो परमानंदाचा पुतळा । जो जिवाचा जिव्हाळा । विश्वाचिया ॥२६९॥
जो सर्वज्ञतेचा ओलावा । जो यादवकुळीचा कुळदिवा । तो श्रीकृष्णजी पांडवा । प्रति बोलला ॥२७०॥
ऐसा कुरुक्षेत्रीचा वृत्तांत । संजय धृतराष्ट्रा असे सांगत । तोच पुढे ऐका साद्यंत । ज्ञानदेव म्हणे ॥२७१॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगोनाम अष्टमोऽध्याय: ॥८॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०